शुक्रवार, दिनांक 26 जानेवारी 2024 निमित्त महाईन्यूजच्या कार्यालयास सुट्टी असल्याने शनिवार दिनांक 27 जानेवारी 2024 चा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.
प्रजासत्ताक दिनाच्या खूप खूप शुभेच्छा
-संपादक

| वर्ष - 7 | अंक - 257 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

वंदे मातरम
प्रजासत्ताकदिनानिमित्त
देशबांधवांना शुभेच्छा!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 26 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भगवे वादळ नवी मुंबईत दाखल!

## लाखोंचा जनसमुदाय अवतरला; समाज बांधवांकडून मोफत अन्नदान

**। नवी मुंबई । महाईन्यूज ।**

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लाखोंच्या संख्येने मोर्चेकऱ्यांनी गुरुवारी मुंबईच्या दिशेने मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली आगेकूच केली आहे. रात्री उशिरा हजारोंच्या ताफ्यात मनोज जरांगे पाटील नवी मुंबईमध्ये दाखल झाले. मुंबईच्या सीमेवरील नवी मुंबईमधील एपीएमसी मार्केटमध्ये शेवटच्या मुक्कामी होते. तर नवी मुंबई शहरात विविध मंडळांनी, मराठा समाजाच्या बांधवांनी जरांगे पाटील आणि दाखल झालेल्या आंदोलकांसाठी भोजनाची व्यवस्था केली होती.**



पनवेल ते नवी मुंबईकडे जाणाऱ्या महामार्गावर ठिकठिकाणी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. २५ जानेवारी रोजी मराठा मोर्चा नवी मुंबई मध्ये दाखल झाला असून एपीएमसी बाजार आवारात आंदोलनकर्ते मुक्कामी होते. यासाठी बाजार समिती प्रशासनाने पाचही मार्केट बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे वाशी मधील एपीएमसी बाजार आवारात सकाळपासूनच शुकशुकाट होता. तर दुसरीकडे आंदोलनकर्त्यांच्या जेवणासाठी सकाळपासूनच तयारी सुरु ठेवण्यात आली होती. नवी मुंबई मधील मराठा समाज बांधव तसेच माथाडी- मापाडी कामगारांद्वारे पाच ते सात लाख लोकांसाठी पाचही बाजार आवारात जेवणावळी मांडण्यात आली होती.

नवी मुंबई महापालिका देखील दिमतीला हजर होती. महापालिकेने पाण्याचे टँकर तसेच फिरते शौचालय सुविधा दिली होती. संध्याकाळी सात वाजल्यानंतर जरांगेंच्या ताफ्यातील ग्रामीन भागातून दाखल झालेली वाहनांनी नवी मुंबईकडे धाव घेतली.

पनवेल ते वाशी असा येण्याचा मार्ग बदलून पामबीच मार्ग करण्यात आल्याने सर्वत्र गर्दी पहायला मिळाली. नवी मुंबईत मुख्यस्थळी ५ लाखांहून अधिक नागरिकांची जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. रात्री उशिरा जरांगे यांचे नवी मुंबईत आगमन झाले.

### खोपोली महामार्गावर 20 ते 25 किमीच्या वाहनांच्या रांगा

पनवेल शहर प्रवेशद्वार कळंबोली, कामोठे, बेलापूर, वाशी तुर्भे मार्केट परिसर येथे आंदोनला समर्थन देत जरांगे यांच्या स्वागताचे फलक लावण्यात आले होते. तर पाणी, जेवणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. अनेक ठिकाणी डिजे लावण्यात आले होते. लोणावळा येथे जरांगे पाटील आल्यानंतर त्यांना खोपोलीला येण्यासाठी तब्बल ८ ते ९ तास लागले. त्यांच्या समवेत ग्रामीण भागातील लहान मोठी वाहने घेऊन समाज बांधव होते. त्यामुळे खोपोली महामार्गावर २० ते २५ किमीच्या वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

# पुणेकर गारठले; राज्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद!

## लोणावळ्यात 16.2, मगरपट्ट्यात 15.6 तर पिंपरी-चिंचवडमध्ये 14.9 किमान तापमान

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शहर आणि परिसरात गुरुवारी ही किमान तापमानात घट होण्याचा कल कायम राहिला. राज्यातील सर्वात कमी किमान तापमानाची नोंद पुण्यात झाली. शिवाजीनगरमध्ये ८.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. हवेत दिवसभर गारठा राहिल्याने पुणेकरांना हुडहुडी भरली होती.**

पुणे शहर आणि परिसरात बुधवारी यंदाच्या हिवाळ्यातील सर्वात कमी किमान तापमानाची नोंद झाल्यानंतर गुरुवारीही कमाल आणि किमान तापमानात घट झाली. बुधवारच्या तुलनेत कमाल तापमानात ०.७ आणि किमान तापमानात २.५ अंश सेल्सिअसने घट होऊन कमाल तापमान २९.७ तर किमान तापमान ८.६ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले.

शहरात एनडीए परिसरात ७.६, हवेलीत ७.८ आणि शिवाजीनगरमध्ये ८.६ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे.



गुरुवारी दिवसभर हवेत गारठा जाणवत होता. दुपारी तासभर उन्ह पडल्यानंतर पुन्हा हवेत गारठा वाढला होता. शहराप्रमाणेच जिल्ह्याच्या विविध भागांत किमान तापमानात घट झाल्याचे दिसून आले. शिरुरमध्ये ७.४, माळीणमध्ये ७.८, बारामतीत ८.७, दौंडमध्ये ९.२, राजगुरुनगरमध्ये ९.४, नारायणगाव आणि आंबेगावात १०.० अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. एकीकडे किमान तापमानात घट होऊन थंडी वाढत असतानाच दुसरीकडे लवळेत १७.०, वडगावशेरीत १७.०, लोणावळ्यात १६.२, मगरपट्ट्यात १५.६ आणि चिंचवडमध्ये १४.९ इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे.

# अजित पवारांच्या जुन्नर दौऱ्याला विरोध

## » काळे झेंडे दाखवत जोरदार मराठा संघटनांची घोषणाबाजी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जुन्नर मतदारसंघाच्या दौऱ्यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या (AJIT PAWAR JUNNAR VISIT) ताफ्याला मराठा संघटनांनी काळे झेंडे दाखवल्याची घटना घडली. आरक्षणाच्या मागणीवरुन मराठा समाजाच्या आंदोलकांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. अजित पवार हे पुण्यातील जुन्नर विधानसभेचा दौरा करत असून त्यावेळी ही घटना घडली.**



अजित पवारांनी मराठा समाजाला उद्देशून केलेल्या वक्तव्याचा निषेधार्ह अहमदनगर-कल्याण महामार्गावरील आळे फाटा परिसरात मराठा संघटनांकडून हे झेंडे दाखवण्यात आले. मनोज जरांगे यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनावेळी अजित पवारांनी हा दौरा रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र मराठा समाजाच्या या मागणीला झुगारून अजित पवार दौऱ्यावर आले. त्यामुळं मराठा समाज आक्रमक झाला असून त्यांनी अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले. मराठा आरक्षण लवकरात लवकर मिळावं यासाठी घोषणाबाही केली. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतलं आहे.राष्ट्रवादीच्या फुटीनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे पहिल्यांदाच जुन्नर विधानसभेचा दौरा करत आहेत. आजवर तटस्थ राहिलेले राष्ट्रवादीचे आमदार अतुल बेनकेंनी हा दौरा आखला आहे. यानिमित्ताने मतदारसंघात झळकलेल्या फ्लेक्सवर शरद पवारांना स्थान नाही. शरद पवारांनी जुन्नरमध्ये शेतकरी मेळावा घेऊन दोन आठवडे ही उलटले नाहीत, तोवर अतुल बेनके यांनी अजित पवारांच्या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केलं आहे. यावरून बेनके आता अजित दादांच्या गटात सामील झाल्याचे संकेत मिळत आहेत. अजित पवारांसोबत महायुतीच्या तिकिटावर शिरूर लोकसभा लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असणारे शिंदे गटाचे नेते शिवाजी आढळरावही उपस्थित आहेत.आतापर्यंत अतुल बेनके हे तटस्थ होते. त्यांनी नेमकी त्यांची भूमिका स्पष्ट केली नव्हती. मात्र काही दिवसांपूर्वी शरद पवारांनी अतुल बेनके यांना जुन्नरमध्ये पर्याय उपलब्ध करून दिला. शरद पवारांनी ऑफर दिली तर जुन्नर विधानसभा मी लढवणार, असं काँग्रेसचे युवा नेते सत्यशील शेरकर यांनी शरद पवार हे जुन्नर दौऱ्यावर असताना म्हटलं होतं. आपली भूमिका जाहीर न केलेल्या अतुल बेनके यांना शरद पवारांनी राजकीदृष्ट्या घेरायला सुरूवात केल्याची चर्चा रंगली होती. हे सगळं घडल्यानंतर लगेच अतुल बेनके यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आता थेट बेनके यांनी अजित पवार गटात सामील होणार असल्याचं जाहीर केलं आहे. जुन्नर हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जातो. या ठिकाणी आमदार अतुल बेनके हे निवडून आले आहेत. आपण कुणाच्याही गटात नाही, आपली निष्ठा फक्त पवार कुटुंबीयांसोबत आहे असं जरी अतुल बेनके म्हणत होते तरी त्यांची अजित पवारांशी जवळीकता सर्वश्रूत होतं. त्यामुळे ते कधीही अजित पवार गटात जातील याची शक्यता नाकारता येत नव्हती अखेर त्यांनी अजित पवार गटात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. अजित पवारांनी मराठा समाजाला उद्देशून केलेल्या वक्तव्याचा निषेधार्ह अहमदनगर-कल्याण महामार्गावरील आळे फाटा परिसरात मराठा संघटनांकडून हे झेंडे दाखवण्यात आले. मनोज जरांगे यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनावेळी अजित पवारांनी हा दौरा रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र मराठा समाजाच्या या मागणीला झुगारून अजित पवार दौऱ्यावर आले. त्यामुळं मराठा समाज आक्रमक झाला असून त्यांनी अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले. मराठा आरक्षण लवकरात लवकर मिळावं यासाठी घोषणाबाही केली.

### अतुल बेनके अजित पवार गटात

» पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतलं आहे.राष्ट्रवादीच्या फुटीनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे पहिल्यांदाच जुन्नर विधानसभेचा दौरा करत आहेत. आजवर तटस्थ राहिलेले राष्ट्रवादीचे आमदार अतुल बेनकेंनी हा दौरा आखला आहे. यानिमित्ताने मतदारसंघात झळकलेल्या फ्लेक्सवर शरद पवारांना स्थान नाही. शरद पवारांनी जुन्नरमध्ये शेतकरी मेळावा घेऊन दोन आठवडे ही उलटले नाहीत, तोवर अतुल बेनके यांनी अजित पवारांच्या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केलं आहे. यावरून बेनके आता अजित दादांच्या गटात सामील झाल्याचे संकेत मिळत आहेत. अजित पवारांसोबत महायुतीच्या तिकिटावर शिरूर लोकसभा लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असणारे शिंदे गटाचे नेते शिवाजी आढळरावही उपस्थित आहेत.आतापर्यंत अतुल बेनके हे तटस्थ होते. त्यांनी नेमकी त्यांची भूमिका स्पष्ट केली नव्हती. मात्र काही दिवसांपूर्वी शरद पवारांनी अतुल बेनके यांना जुन्नरमध्ये पर्याय उपलब्ध करून दिला.

# जर-तरला अर्थ नाही, मुंबईकडे गाड्यांचे तोंड करून ठेवा

## » शिष्टमंडळाच्या भेटीवर मनोज जरांगें पाटीलांची प्रतिक्रिया

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईकडे निघालेल्या मनोज जरांगे यांची आज पुन्हा एकदा भेटीसाठी सरकारचं शिष्टमंडळ पोहचले आहेत. मात्र, शिष्टमंडळासोबत कोणतेही चर्चा झालेली नाही. आपण आधी आंदोलकांशी चर्चा करणार आहोत, त्यानंतरच सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा करणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. तर मराठा समाजासोबत झालेल्या चर्चेनंतरच पुढील निर्णय़ घेणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत.**



ओबीसीमधूनच्या आरक्षणावर आपण ठाम असल्याचे देखील जरांगे म्हणाले आहेत. दरम्यान पुढे बोलतांना जरांगे म्हणाले की, जर-तरला अर्थ नाही, आंदोलकांना मुंबईकडे गाड्यांचे तोंड करून ठेवा असे सांगणार आहे. निर्णय झाला तर ठीक अन्यथा चलो मुंबई यासाठी आम्ही तयार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. त्यामुळे, जरांगे आणि शिष्टमंडळात होणारी बैठक महत्वाची ठरणार आहे. आज शिष्टमंडळ माझ्या भेटीसाठी आले होते. सकाळी आठ वाजता हे शिष्टमंडळ आले. मात्र, मी 10 वाजता उठलो. परंतु, आमची कोणतेही चर्चा शिष्टमंडळाशी झालेली नाही. मी आधी आमच्या आंदोलकांशी चर्चा करणार आहोत. आमची चर्चा झाल्यावर शिष्टमंडळ यांच्यासोबत चर्चा करणार आहोत. तोपर्यंत आमच्या वाहनांचे तोंड मुंबईकडे करून ठेवले जाणार आहे. निर्णय झाल्यावर आम्ही पुढे जाणार नाही. आम्हाला मुंबईला जाण्याची हौस नाही, असेही जरांगे म्हणाले आहेत.

### मुंबईला जाण्याची हौस नाही

» मनोज जरांगे यांच्या मुंबई आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून हालचाली वाढल्या आहेत. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड हे सतत जरांगेंची भेट घेत आहे. दोन दिवसांपूर्वी मधुकरराजे आर्दड आणि छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी आस्तिककुमार पांडेय यांनी रांजणगाव गणपती येथे जरांगे यांची भेट घेतली होती. यावेळी, पहाटे चार वाजता चर्चेला सुरुवात झाली. दरम्यान, जरांगे यांनी काही सूचना दिल्या होत्या. त्यावर निर्णय घेण्यासाठी आज पुन्हा शिष्टमंडळ जरांगे यांच्या भेटीला आले आहेत.मनोज जरांगे यांची आज पुन्हा एकदा भेटीसाठी सरकारचं शिष्टमंडळ पोहचले आहेत. मात्र, शिष्टमंडळासोबत कोणतेही चर्चा झालेली नाही. आपण आधी आंदोलकांशी चर्चा करणार आहोत, त्यानंतरच सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा करणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत.

# ‘जल्लोष शिक्षणाचा 2024’ अंतर्गत संगणक, विज्ञान मार्गदर्शिकेचे अनावरण!

## पाय जॅम फाउंडेशनच्या सहाय्याने 250 हून अधिक शिक्षकांचे मूलभूत प्रशिक्षण पूर्ण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि महानगरपालिका शाळांचे यश साजरे करण्यासाठी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे “जल्लोष शिक्षणाचा २०२४” या कार्यक्रमाचे पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पाय जॅम फाउंडेशनच्या सहाय्याने २५० हून अधिक शिक्षकांचे मूलभूत संगणक आणि कोडींग प्रशिक्षण पूर्ण करून, या सर्व प्रशिक्षित शिक्षकांना वर्गामध्ये मुलांना संगणक विज्ञानाचे धडे देण्यासाठी आवश्यक ‘कॉम्प्युटर विज्ञान मार्गदर्शिकेचे’ अनावरण खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते करण्यात आले.**




यावेळी आमदार उमा खापरे, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उल्हास जगताप, पाय जॅम फौंडेशनच्या प्रांजली पाठक, महेश तोत्रे आणि शुभम बडगुजर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी मांडलेल्या समस्या आणि त्यावर तंत्रज्ञानाचा उपयोग करून सुचविलेले उपाय सादर केले होते. सॅनिटरी वेंडिंग मशीन, नदीतून कचरा गोळा करण्याचे यंत्र याचे आ. उमा खापरे यांनी कौतुक केले.

शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी सांगितले की, अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी उपयोग होतो. यामुळे स्पर्धात्मक वातावरण तयार होऊन गुणवत्तेसाठी शाळांमध्ये स्पर्धा होते. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलागुणांना वाव मिळतो.

आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सर्व महानगरपालिका शाळांना डिजिटल संसाधने उपलब्ध केली गेली असून, त्या संसाधनांचा उपयोग विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित करण्यासाठी व्हावा यासाठी मनपा आणि पाय जॅम फौंडेशन काम करीत आहे. विद्यार्थ्यांना नव तंत्रज्ञानाचा वापर, क्लिष्ट समस्या सोडवण्यासाठी तंत्रज्ञान आत्मसात करता यावे यासाठी आवश्यक ते किट ३४ माध्यमिक शाळा व भागशाळा यांना मनपा आणि पाय जॅम फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणार आहेत.

शालेय अभ्यासाव्यतिरिक्त मुलांमधील सुप्त गुणांचा विकास व्हावा या उद्देशाने इनोवेशन हॅकाथॉन, विज्ञान प्रकल्प, शाळांचे विशेष प्रकल्प व स्वयंसेवी संस्था यांना यावर्षी विशेष स्थान देण्यात आले आहे. पाय जॅम फाउंडेशनने मनपा बरोबर केलेल्या करारा नुसार शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, पाय लॅब आणि हॅकाथॉन यासारखे उपक्रम त्या दृष्टीने राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी हॅकॅथॉन सारख्या स्पर्धेमधून तंत्रज्ञानाचा उपयोग करून त्यांच्या आजूबाजूच्या समस्या कशाप्रकारे सोडविता येतील याविषयीच्या प्रकल्पांचे उत्तम सादरीकरण केले असल्याचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले.

### डिजिटल साक्षरता वाढविण्यावर भर

**» पाय जॅम फौंडेशन सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवणे, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे निर्माते बनण्यासाठी सक्षम करणे, सरकारी शाळांसाठी अभ्यासक्रम विकसित करणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत अनिवार्य कौशल्यांमध्ये शिक्षकांची क्षमता वाढविणे आणि कमी खर्चाच्या संगणक विज्ञान प्रयोगशाळा अर्थात ‘पाय लॅब्ज’ चालविणे यासारखी समाजहितोपयोगी उद्दिष्टांसाठी २०१७ पासून कार्यरत आहे अशी माहिती पाय जॅम फौंडेशनच्या प्रांजली पाठक यांनी प्रसिद्धीस दिली आहे.**

# प्रजासत्ताक दिनानिमित्त महापालिकेच्या मुख्यालयात ध्वजारोहणाचा सोहळा!

## भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात येणार

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शुक्रवार दि. २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ८ वाजता पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने पिंपरी येथील महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ संपन्न होणार आहे.**

ध्वजारोहण समारंभापुर्वी सकाळी ७ वाजून ५० मिनिटांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात येणार आहे. यावेळी महापालिका सुरक्षा रक्षक दल, अग्निशमन दल, पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाचे जवान ध्वजसंचालन करणार आहेत. या सोहळ्यासाठी खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, संग्राम थोपटे, अण्णा बनसोडे, महेश लांड़गे, अश्विनी जगताप यांच्यासह सर्व माजी महापौर, माजी खासदार आमदार, माजी नगरसदस्य तसेच शहरातील मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या या समारंभाला महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित असतील. शहरवासियांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे,



असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप यांनी केले आहे. अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा, यासाठी महापालिकेच्या अधिकृत फेसबुक पेज तसेच यु टयूब चॅनेलद्वारे सोहळ्याचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. या दिवशी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीवर तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या इमारतींवर विद्युत रोषणाई करण्यात येईल.

### नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे


**» महापालिकेच्या सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये क्षेत्रीय अधिकारी, महापालिका शाळांमध्ये मुख्याध्यापक, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्राचार्य तर विभागीय कार्यालयांमध्ये शाखाप्रमुखांच्या हस्ते सकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे. तत्पूर्वी याठिकाणी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन केले जाईल. शालेयस्तरावर वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा/देशभक्तीपर निबंध व गीत स्पर्धांचे आयोजन केले जाणार असुन प्रभात फेऱ्या काढण्यात येणार आहेत. तसेच भक्ती शक्ती, निगडी येथे सकाळी १० वाजता देशभक्तीपर गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे. यामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.**




# राजेशाही चौकटीत लोकशाहीची पेरणी

**औंधच्या संस्थानात ज्याप्रमाणे अनोखा प्रयोग झाला तसे प्रयोग आणखी काही संस्थानांत झाले होते. इंदौरचे दिवाण सर तंजोर माधवराव यांनी १८७४ साली संविधान लिहिले होते. प्रभावी प्रशासनासाठी हे संविधान उपयुक्त होते. या संविधानाने कायद्याचे राज्य स्थापित केले होते. अभिव्यक्तीचे आणि सभेचे स्वातंत्र्य, माध्यमस्वातंत्र्य मान्य केले होते.**

अगदी खासगी संपत्तीचा हक्कही असला पाहिजे, अशी तरतूद त्यात होती. धार्मिक सहिष्णुतेच्या तत्त्वाला महत्त्व दिले होते. प्रा. राहुल सागर यांनी सर तंजोर माधवराव यांच्यावर 'प्रोग्रेसिव्ह महाराजा' हे पुस्तक लिहिले. २०२२ मध्ये ऑक्सफर्डने हे पुस्तक प्रकाशित केले. या प्रयत्नाप्रमाणेच म्हैसूर संस्थानातला प्रयोगही लक्षवेधक होता. या संस्थानात लोकशाही होती. वडियार राजांनी कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचा तिथे प्रयत्न केला होता. चमराजेंद्र वडियार राजे सत्तेवर आले आणि १८८१ पासून या संस्थानात निवडणुका होऊ लागल्या. येथे प्रजा प्रतिनिधी सभा हे लोकप्रतिनिधींचे सभागृह स्थापित केले होते. या संस्थानात राजकीय पक्षीय स्पर्धा आकारास आली होती. काँग्रेस या संस्थानात सक्रिय होती. तिथे सत्तेचे विकेंद्रीकरण केले होते. जिल्हा मंडळ, तालुका मंडळ आणि महापालिका अशा त्रिस्तरीय पद्धतीने पंचायतराज




रचना अस्तित्वात आली होती. पुढे स्वातंत्र्य आंदोलनात म्हैसूर संस्थानाची क्रांतिकारकांना मदत झाली. १९३८ साली म्हैसूर संस्थानात 'ध्वज सत्याग्रह' सुरू झाल्यावर पोलिसांनी गोळीबार केला आणि तीव्र संघर्ष सुरू झाला. मात्र एकुणात या संस्थानाने लोकशाहीसाठी अनुकूल जमीन तयार केली. अगदी तसेच कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी केलेले कार्य काळाच्या कितीतरी पुढे होते. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू महाराज हे भारतातील पहिले राज्यकर्ते असावेत. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे शाहू महाराजांनी आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या इ. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. १९१८-१९ मध्ये त्यांनी त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले आणि अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वतःचे मोटारचालक म्हणून नेमले. तसेच महार-वतन खालसा करून महारांची वेठबिगारीतून आणि गुन्हेगार मानल्या गेलेल्या जातींची 'हजेरी' पद्धतीतून मुक्तता केली. फासेपारधी, कोरवी, माकडवाले यांसारख्या भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. १९१८ साली खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही बलुतेपद्धतीतून मुक्त केले. समाजातील सर्व उद्योगधंदे त्यांच्यासाठी खुले केले. १९२० साली जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा केला. सर्वांना समान व मोफत शिक्षणाचा हक्क शाहू महाराजांनी दिला. सामाजिक न्यायाचे तत्त्व शाहू महाराजांनी अमलात आणले. थोडक्यात, सारी भारतीय संस्थाने मागास आणि कर्मठ असल्याचे जे चित्र उभे केले जाते ते तितकेसे खरे नाही, हे वरील तीनही उदाहरणांवरून दिसून येते. काही संस्थानांमध्ये प्रागतिक संविधानास पूरक वातावरण होते. संस्थानांच्या राजेशाहीच्या चौकटीतही लोकशाही फुलत होती. काँग्रेस या संस्थानासोबत संवादी होती त्यामुळेच काही मोजक्या संस्थानांचा अपवाद वगळता ५०० हून अधिक संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झाली. या संस्थानात लोकशाही होती. वडियार राजांनी कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचा तिथे प्रयत्न केला होता. चमराजेंद्र वडियार राजे सत्तेवर आले आणि १८८१ पासून या संस्थानात निवडणुका होऊ लागल्या. येथे प्रजा प्रतिनिधी सभा हे लोकप्रतिनिधींचे सभागृह स्थापित केले होते. या संस्थानात राजकीय पक्षीय स्पर्धा आकारास आली होती. काँग्रेस या संस्थानात सक्रिय होती. तिथे सत्तेचे विकेंद्रीकरण केले होते. जिल्हा मंडळ, तालुका मंडळ आणि महापालिका अशा त्रिस्तरीय पद्धतीने पंचायतराज रचना अस्तित्वात आली होती.

## संपादकीय »

### घरचे नको दारचे..

***अशांच्या शिरावर पद्मविभूषण वा भारतरत्नचे मुकुट चढवण्यामागे जे आपले नाहीत त्यांस आपल्याकडे वळवणे हा विचार असेल, आणि ते कौतुकास्पद खरेच...***

सामाजिक न्यायाच्या मुद्द्यावर बिहारचे कर्पुरी ठाकूर यांचे कार्य निश्चितच निर्विवाद. तथापि लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर ठाकूर यांस 'भारतरत्न' जाहीर करणे हा आणखी एक 'मास्टरस्ट्रोक' असे हातास हात लावून 'मम' म्हणणाऱ्यांस वाटत असेल तर राजीव गांधी यांनी १९८८ साली तमिळनाडूचे एमजी रामचंद्रन यांस दिलेल्या 'भारतरत्न'चेही कौतुक करावयास हवे. त्यावेळी एमजीआर यांस भारतरत्न दिले जाण्याची संभावना आज ज्यास नवनैतिकवादी असे म्हटले जाते त्या वर्गाने राजकीय निर्णय अशी केल्याचे अनेकांस स्मरेलनिकड असल्याने एकाच वर्षी प्रणब मुखर्जी आणि आगळे संगीतकार भूपेन हजारिका यांस भारतरत्नने गौरविण्याच्या निर्णयाचा दाखलाही या संदर्भात दिला गेल्यास ते अयोग्य ठरणार नाही. किंवा राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांस 'पद्मविभूषण'ने गौरवण्याचा निर्णयही या मालिकेत बसू शकेल.

**आम्ही राज्यातील आमदारांना 'संपर्क'तर्फे विविध विषयांशी संबंधित प्रश्न पाठवतो. २०२२ आणि २०२३ मध्ये सहा अधिवेशनांसाठी २०९ प्रश्न पाठवले होते. ५४ इतकी आहे. गेल्या काही वर्षात ११ मतदारसंघात स्थानिक नागरिकांचे 'आमदार संवाद मंच' तयार व्हावेत असे प्रयत्न 'संपर्क'ने केले आहेत.**

# लोकशाहीला द्यायला हवी 'उत्क्रांती'ची संधी!

या मंचाने स्थानिक समस्या आमदार, अन्य लोकप्रतिनिधींशी बोलून सोडवण्याचा प्रयत्न करावा हा त्यामागचा उद्देश. या समस्यांमध्ये भर पडली आहे ती पक्षांतर आणि फोडाफोडीची. हे 'आमदार संवाद मंच' आता मतदारसंघाचा जाहीरनामा आणि आमदारांसाठी मागण्या तयार करणार आहेत. त्यातला मुख्य मुद्दा पक्षांतर वा पक्षफोडी करून मतदारांना फसवण्याचा आहे. भारतात, लोकप्रतिनिधीचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. मात्र निवडून आल्यानंतर आमदार वा खासदार पक्षांतर करतात. महाराष्ट्रात तर त्यांनी स्वतःच्याच पक्षाविरोधात त्याच पक्षाच्या नावे वेगळा गट निर्माण केला. असे निर्णय घेताना त्यांनी ना स्वतःच्या मतदारांशी चर्चा केलेली असते, ना त्यांना विश्वासात घेतलेले असते. असे निर्णय मतदारांवर लादलेच जातात. प्रहार जनशक्ती' हा आमदार बच्चू कडू यांचा पक्ष. त्यांनी निवडून आल्यानंतर महाविकास आघाडीच्या सरकारला पाठिंबा देऊन मंत्रीपद मिळवले. त्यानंतर त्यांनी



गुवाहाटीत जाऊन मविआ सरकारच्या विरोधातील भाजपला पाठिंबा दिला. वर्षभरात मंत्रीपद न मिळाल्याने त्यांनी पुन्हा भाजपविरोधात भूमिका घ्यायला सुरुवात केली आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अमरावतीच्या उमेदवार नवनीत राणा पराभूत झाल्या. २०१९ मध्ये त्या काँग्रेस व राष्ट्रवादीच्या पुरस्कृत उमेदवार होत्या. मात्र निवडून आल्यानंतर त्या भाजपच्या अंकित झाल्या. बच्चू कडू आणि नवनीत राणा यांच्या निर्णयांनी त्यांच्या मतदारांच्या मताची, निवडीची पायमल्ली झाली नाही का? मविआ सरकारच्या निर्मितीप्रक्रियेत आत्ताचा एकनाथ शिंदे गट शिवसेना पक्ष म्हणून सहभागी होता. अडीच वर्षांनंतर पक्षांतर बंदी कायदा फाटय़ावर मारून पक्षातच वेगळा गट करून त्यांनी सरकार स्थापले. तेच राष्ट्रवादीतही घडले. हा सगळा प्रकार मतदारांचा अधीक्षेप करणारा नाही का? विधिमंडळाच्या समित्या या महत्त्वाच्या वैधानिक व्यवस्थेमार्फत विधिमंडळ वर्षभर काम करत असते. जून २०२२ पासून ही व्यवस्था ठप्प आहे. या समित्यांचे राज्यात ठिकठिकाणी दौरे होतात. त्यांचे अहवाल अधिवेशनात सादर केले जातात. सर्वच २८८ आमदार, विधान परिषदेचे सदस्य कुठल्या ना कुठल्या समितीवर असतात. आज समित्या, त्यांच्या बैठका, दौरे नाहीत. यात नुकसान नागरिकांचे. याला जबाबदार कोण? आपले लोकप्रतिनिधी. मविआ सरकार पायउतार झाल्यावर त्यांनी मार्गी लावलेल्या विकासकामांना स्थगिती दिली गेली. शिंदे गट, अजित पवार गट आणि भाजप आमदार वगळता उर्वरित आमदारांच्या मतदारसंघात निधी दिला गेला नाही. नुकसान त्या त्या मतदारसंघातल्या नागरिकांचेच.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# एकदा मराठा आरक्षण मिळू द्या!

## ज्यांनी अपमान केला त्यांचा हिशेब चुकता करणार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील मुंबईत यायला निघाले आहेत. त्यांच्या मनधरणीचे प्रयत्न सरकारकडून सुरु झाले आहेत. अशात मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाला जे विरोध करणारे आहेत, ज्यांनी अपमान केला त्यांचा हिशेब चुकता करणार असं म्हटलं आहे. मराठा आरक्षण घेतल्याशिवाय आता मुंबईतून उठणार नाही असंही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.**



आत्तापर्यंत आपण शांततेत आंदोलन केलं आहे. एकाही पोराने गडबड केली नाही, होऊ पण दिलेली नाही. मराठे शांत आहेत, दिलेला शब्द पाळणारे आहोत हे माझ्या मायबाप समाजाने राज्याला सिद्ध करुन दाखवलं. मुंबईतही आम्ही शांततेत जाणार, शांततेच बसणार, गडबड करणार नाही. पण आरक्षण घेतल्याशिवाय उठणार नाही. आम्ही या भूमिकेवर कालही ठाम होतो, आजही ठाम आहे आणि उद्याही ठाम राहणार असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. एकदा मी समाजाला शब्द दिला की मी त्यापासून मागे हटत नाही. आजपासून आपले लोक वाढण्यास सुरुवात होणार आहे हे आपल्याला सगळ्यांना माहीत आहे. २६ जानेवारीला महाराष्ट्रातला सगळा समाज आपल्या मुंबईत येणार आहे. मुंबईकरांना त्रास होणार नाही याची खबरदारी आपल्याला घ्यायची आहे. आता आपल्याला स्वयंसेवक व्हायचं आहे. आजपासून तुमच्या सगळ्यांवरची जबाबदारी वाढली आहे. मी तुम्हाला सांगितलं होतं बैठकीचं ती बैठक सुरु झाली आहे. महाराष्ट्रही आमचाच आहे आणि मुंबईही आमचीच आहे असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. आपला मायबाप समाज एकत्र आहे तो तसाच एकवटलेलाच आहे. पुण्यात मी ती एकजूट पाहिली आपण ज्या रस्त्यावरुन चाललो आहोत त्या रस्त्यावर अख्खा मराठा समाज येतो आहे असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले. आपल्या रॅलीत कुणी जाळपोळ किंवा दगडफेक करण्याचा प्रयत्न केला तर त्याला पकडायचं, पळवून लावायचं नाही. त्याला बोटही लावायचं नाही त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात द्यायचं, तुम्हाला स्वयंसेवक म्हणून हे काम करायचंच आहे असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले.मनोज जरांगे पाटील म्हणाले, तुम्हाला कुणी त्रास दिला तर तुम्ही त्याला त्रास देऊ नका, त्याला माझ्यापर्यंत आणा मग मी तुम्हाला दाखवतो. मला विचारल्याशिवाय कुणी कुठलीही कृती करु नका. आपल्या नावाखाली कुणी राजकारण करतो आहे का? काडी लावण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला मी पोलिसाच्या गाडीत उचलून टाकेन. आपल्याला सगळ्यांना शांत राहायचं आहे. मुंबईत शांततेत आंदोलन करायचं आहे. जेवायचं, खायचं आणि झोपायचं आहे, मान्य आहे का? त्यावर गर्दीतून सगळे हो असे ओरडले. माझ्या समाजाने शब्द दिला आहे ते मी सरकारला आता सांगू शकतो असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले. शांततेच्या युद्धात खूप ताकद आहे हे कुणी विसरु नका. आपल्याला आरक्षण पाहिजे आणि आपण शांततेचं युद्ध लढतो आहोत. आरक्षण शेवटच्या टप्प्यात आलं आहे. आत्तापर्यंत ५४ लाख मराठ्यांना आरक्षण मिळालं आहे. त्यांना तातडीने आरक्षण प्रमाणपत्र द्या.मला आरक्षण शांततेत घेऊ द्या. मग विरोध करणाऱ्या एक एकाला पाहतो. आपल्या विरोधकांची वळवळच बंद करतो. ही एकजूट अशीच कायम ठेवा. मी तुमचा शब्द मोडणार नाही, तुम्ही माझा शब्द मोडू नका. शेवटच्या माणसाला आरक्षण मिळेपर्यंत आंदोलन बंद होणार नाही. आंतरवलीतलं आंदोलन आजही सुरु आहे. मी सुद्धा अपमान पचवला आहे. सगळ्यांचे हिशेब होणार मात्र आधी आरक्षण मिळाल्यावर. आजूबाजूला लक्ष ठेवा असंही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

### शांततेच्या युद्धात खूप ताकद

मनोज जरांगे पाटील म्हणाले, तुम्हाला कुणी त्रास दिला तर तुम्ही त्याला त्रास देऊ नका, त्याला माझ्यापर्यंत आणा मग मी तुम्हाला दाखवतो. मला विचारल्याशिवाय कुणी कुठलीही कृती करु नका. आपल्या नावाखाली कुणी राजकारण करतो आहे का? काडी लावण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला मी पोलिसाच्या गाडीत उचलून टाकेन. आपल्याला सगळ्यांना शांत राहायचं आहे. मुंबईत शांततेत आंदोलन करायचं आहे. जेवायचं, खायचं आणि झोपायचं आहे, मान्य आहे का? त्यावर गर्दीतून सगळे हो असे ओरडले. माझ्या समाजाने शब्द दिला आहे ते मी सरकारला आता सांगू शकतो असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले. शांततेच्या युद्धात खूप ताकद आहे हे कुणी विसरु नका. आपल्याला आरक्षण पाहिजे आणि आपण शांततेचं युद्ध लढतो आहोत. आरक्षण शेवटच्या टप्प्यात आलं आहे. आत्तापर्यंत ५४ लाख मराठ्यांना आरक्षण मिळालं आहे. त्यांना तातडीने आरक्षण प्रमाणपत्र द्या.मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील मुंबईत यायला निघाले आहेत. त्यांच्या मनधरणीचे प्रयत्न सरकारकडून सुरु झाले आहेत. अशात मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाला जे विरोध करणारे आहेत, ज्यांनी अपमान केला त्यांचा हिशेब चुकता करणार असं म्हटलं आहे.

# सर्वात जुन्या शेअर बाजारात असा साजरा होणार प्रजासत्ताक दिन

## प्रजासत्ताकच्या पूर्वसंध्येला दिव्यांनी उजळून निघेल शेअर बाजार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशाच्या 75 वा प्रजासत्ताक दिन साजरा होत असून त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे गुरुवारी शेअर बाजारातही त्याचा उत्साह असल्याचं दिसून येतंय. देशाचा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी गुरुवारी संध्याकाळी मुंबई शेअर बाजाराची इमारत देशाच्या तिरंग्या राष्ट्रध्वजाच्या तीन रंगात सजलेली पाहायला मिळणार आहे.**

75 वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी संपूर्ण देशभरात उत्साह दिसून येतोय. त्या निमित्ताने मुंबईतील रस्ते, वाहने, अनेक संस्था यांवर तिरंगा आणि तिरंग्यांची सजावट सहज पाहायला मिळत आहे. शेअर बाजाराच्या मुख्य इमारतींपैकी एक असलेल्या BSE ची आयकॉनिक इमारत देखील भगव्या, पांढऱ्या आणि हिरव्या रंगात सजलेली दिसेल. जसजशी संध्याकाळ जवळ येईल तसतशी बीएसईची इमारत देशाच्या प्रजासत्ताकाच्या रंगात उजळून निघेल. सर्व छायाचित्रकारांना, माध्यमांना ही नवीन रंगात सजलेली BSE बिल्डिंग पाहण्यासाठी आणि फोटो काढण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.26 जानेवारी रोजी शेअर बाजाराला सुट्टी जाहीर करण्यात




आली आहे. त्यामुळे बीएसई आणि एनएसईमध्ये व्यवहार बंद राहतील. कमोडिटी बाजारात सुट्टी राहणार असून चलन बाजारही बंद राहणार आहे. अशा प्रकारे शेअर बाजारातील हा आणखी एक लाँग वीकेंड ठरला आहे. यानंतर शुक्रवारी प्रजासत्ताक दिन असून शनिवार आणि रविवारी जागतिक शेअर बाजारांप्रमाणे भारतीय शेअर बाजार बंद राहतात.गेल्या वर्षी झालेल्या दिवाळीनिमित्त बीएसईची इमारतही दिव्यांनी उजळून निघाली होती. त्यावेळी ही इमारत रंगीबेरंगी दिव्यांनी सजली होती. यावेळीही त्याचे सुंदर फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले होते. 75 वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी संपूर्ण देशभरात उत्साह दिसून येतोय. त्या निमित्ताने मुंबईतील रस्ते, वाहने, अनेक संस्था यांवर तिरंगा आणि तिरंग्यांची सजावट सहज पाहायला मिळत आहे. शेअर बाजाराच्या मुख्य इमारतींपैकी एक असलेल्या BSE ची आयकॉनिक इमारत देखील भगव्या, पांढऱ्या आणि हिरव्या रंगात सजलेली दिसेल. जसजशी संध्याकाळ जवळ येईल तसतशी बीएसईची इमारत देशाच्या प्रजासत्ताकाच्या रंगात उजळून निघेल.

### राष्ट्रपती मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार

आज प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या देशाला संबोधित करणार आहेत. संध्याकाळी त्या संपूर्ण देशाला संबोधित करतील आणि भारतीय प्रजासत्ताकाला प्रजासत्ताकची 74 वर्षे कशी झाली याचा लेखाजोखा मांडतील. प्रजासत्ताक म्हणून भारत कसा असेल याचेही आकलनही वर्षे देऊ शकतात.देशाच्या 75 वा प्रजासत्ताक दिन साजरा होत असून त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे गुरुवारी शेअर बाजारातही त्याचा उत्साह असल्याचं दिसून येतंय.

# चीन-तैवान वाद जगासाठी चिंताजनक!

## ‘स्वतंत्र तैवान’वादी पक्ष पुन्हा सत्तेत आल्यामुळे चीनला राग

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आंतरराष्ट्रीय राजकारणातील या वर्षीची महत्वाची घटना म्हणून तैवानमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकांचा उल्लेख करावा लागेल. एकविसाव्या शतकात अमेरिका आणि चीन यांच्यात सुरू असलेल्या शीतयुद्धात ‘तैवान’ हे महत्वाचे प्यादे आहे. तैवान आमचा आहे, असा चीनचा बराच जुना दावा आहे. चीनचे सर्वेसर्वा क्षी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखालचा चीन आज ना उद्या तैवान घशात घालण्याचा जोरदार प्रयत्न करेल, असा अंदाज आहे. काय वाट्टेल ते झाले तरी अमेरिका चीनचे हे स्वप्न पूर्ण होऊ देणार नाही.**



या तापलेल्या पार्श्वभूमीवर तैवानमध्ये मागच्या आठवड्यात झालेल्या निवडणुकांकडे पाहावे लागेल. या निवडणुकांत मतदारांना नवे राष्ट्राध्यक्ष आणि नवे विधिमंडळ निवडून द्यायचे होते. सत्ताधारी डेमोक्रॅटीक प्रोगेसिव्ह पार्टी, महत्वाचा विरोधी पक्ष- कुओमितांग पक्ष आणि २०१९ साली स्थापन झालेली तैवान पीपल्स पार्टी हे तीन प्रमुख पक्ष रिंगणात होते.चीनसारखा भीमकाय देश शेजारी असला म्हणजे तैवानसारख्या चिमुकल्या (राजधानीः तायपेयी, लोकसंख्याः सुमारे अडीच कोटी) देशाच्या अंतर्गत राजकारणात ‘चीनशी संबंध’ हा फार महत्वाचा मुद्दा ठरतो. (भारताला याचा अनुभव आहे. पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका वगैरे देशांतसुद्धा ‘भारताशी संबंध’ हा मुद्दा महत्वाचा असतोच)। चीन व तैवान यांच्यातील नैसर्गिक सीमा म्हणजे तैवानचा सुमारे १३० किलोमीटर लांबीचा सामुद्रधुनी। आता निवडणुका जिंकलेल्या डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्षाला ‘स्वतंत्र, सार्वभौम तैवान’ हवा आहे. चीनचे कट्टर विरोधक समजले जात असलेले आणि आधी उपराष्ट्राध्यक्षपदी असलेले लाई चिंग-ते आता राष्ट्राध्यक्षपदावर विराजमान होतील. गेल्या तीन अध्यक्षीय निवडणुकांत हा पक्ष विजयी होत आला आहे. त्यामुळे सर्वसामान्य तैवानी जनतेला ‘स्वतंत्र तैवान’ हवा आहे, असा निष्कर्ष काढता येतो, मात्र चीनशी जुळवून घेतले पाहिजे, अशी कुओमिंगतांग या पक्षाची भूमिका आहे, तर तैवान पिपल्स पक्ष मध्यममार्गी आहे. मतदानाची टक्केवारी बघितली तर तैवानी मतदारांनी दिलेल्या कौलाचा अंदाज करता येतो. निवडून आलेल्या लाई चिंग-ते यांना सुमारे ४० टक्के मते, त्यांचे नजिकचे प्रतिस्पर्धी हाऊ यू-इ यांना ३३.५ टक्के तर वेज-जे यांना २६.५ टक्के मते मिळाली आहेत. याचा अर्थ लाई चिंग-ते यांचा विजय ‘दणदणीत’ नाही. अध्यक्षपदाची निवडणूक तिसऱ्यांदा जिंकलेल्या या पक्षाला विधीमंडळात बहुमत मिळवता आलेले नाही, हेसुद्धा लक्षात घ्यावे लागते.साम्यवादी चीनची १९४९ सालापासून भूमिका आहे की तैवान चीनचा अविभाज्य भाग असून आज ना उद्या तैवानला चीनमध्ये विलीन व्हावे लागेल. चीन जरी ही भूमिका नेहमी मांडत असला तरी याबद्दल एवढी वर्षे साम्यवादी चीन फारसा आक्रमक नव्हता. क्षी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखालचा चीन अतिशय आक्रमक झाला असून चीनने जाहीर केले आहे की तैवानने लवकरात लवकर चीनमध्ये विलीन व्हावे. वेळ पडल्यास आम्हाला यासाठी लष्करी कारवाई करावी लागेल. तैवानबद्दल चीनची ही भूमिका काय आहे, हे समजून घेण्यासाठी अनेक मुद्दे थोडक्यात समजून घ्यावे लागतील. त्यासाठी आधुनिक चीनचा इतिहास नजरेखालून घालणे गरजेचे आहे. तैवान इ.स. १६८३ सालापर्यंत चीनी साम्राज्याचा भाग नव्हता. या वर्षी चीनने तैवानचा पराभव केला व हळुहळू तैवानला चीनचा भाग बनविण्याची प्रक्रिया सुरू झाली. इ.स. १८९५ साली झालेल्या चीन-जपान युद्धात चीनला तैवानचा ताबा जपानला द्यावा लागला. दुसऱ्या महायुद्धात जपानने तैवानचा लष्करी तळ म्हणून वापर केला व स्वतःचे साम्राज्य आग्नेय आशियात विस्तारले. जगातील अनेक देशांप्रमाणे चीनमध्येसुद्धा विसावे शतक सुरू होईपर्यंत साम्राज्यशाही होती.

### मार्क्सवादी कार्यक्रमांचा अंतर्भाव

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जगभर बदलांचे वारे वाहू लागले. ते चीनमध्ये डॉ. सुन यात सान (१८६६ ते १९२५) यांच्या रूपाने दाखल झाले. डॉ. सुन यात सान यांच्या प्रयत्नांनी इ.स. १९११ मध्ये चीनमधील साम्राज्यशाही संपली व ‘प्रजासत्ताक चीन’चा उदय झाला. त्यानंतर १० वर्षांनी म्हणजे इ.स. १९२१ मध्ये ‘चीन कम्युनिस्ट पार्टी’ची स्थापना झाली. साम्राज्यशाहीचे अवशेष पूर्णपणे संपवण्यासाठी डॉ. सान यांनी सोव्हिएत युनियनशी १९२३मध्ये करार केला. या मदतीच्या मोबदल्यात डॉ. सान यांनी त्यांच्या पक्षाच्या म्हणजे ‘कोमींगटान’च्या जाहिरनाम्यात काही मार्क्सवादी कार्यक्रमांचा अंतर्भाव केला.


# जगदीश शेट्टर यांची भाजपात घरवापसी

## शेट्टर यांची आठ महिन्यांतच काँग्रेसला सोडचिठ्ठी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कर्नाटक मधील काँग्रेस नेते व माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांनी पुन्हा एकदा भाजपमध्ये प्रवेश केला आहे. २०२३ मध्ये कर्नाटक विधानसभा निवडणूक अगदी जवळ आलेली असताना शेट्टर यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. शेट्टर यांना भाजपाने तिकीट नाकारल्यामुळे नाराज होऊन त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. आता पुन्हा जगदीश शेट्टर यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर भाजपमध्ये घरवापसी केली आहे.**



यावेळी कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री व भाजप नेते बी. एस. येडियुरप्पा, केंद्रीय मंत्री भूपेंद्र सिंह यादव, कर्नाटक भाजपाचे प्रदेशाध्यक्ष विजयेंद्र येडियुरप्पा आणि केंद्रीय राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर उपस्थित होते.भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर शेट्टर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, “भाजपमध्ये मला अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या होत्या. काही अडचणींमुळे मी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. मागील आठ ते नऊ महिन्यांपासून भाजपमधील नेत्यांसोबत चर्चा सुरू होती. अनेक भाजपा कार्यकर्त्यांनी मला पुन्हा पक्षात प्रवेश करण्याबाबत सुचवले होते. मी भाजपामध्ये पुन्हा यावे अशी बी. एस. येडियुरप्पा आणि विजयेंद्र येडियुरप्पा यांची इच्छा होती.”तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मोठा विजय संपादन करुन पुन्हा एकदा पंतप्रधान होतील, असा विश्वासही शेट्टर यांनी भाजपामध्ये प्रवेश करताना व्यक्त केला. दरम्यान, जगदीश शेट्टर हे भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा मागील काही दिवसांपासून कर्नाटकातील राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली होती. कर्नाटकात भाजपाकडे चांगले नेतृत्व नसल्याने त्यांना शेट्टर यांची आठवण येत असल्याची टीका काँग्रेसचे नेते आणि मंत्री प्रियांक खरगे यांनी केली. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शेट्टर यांच्या भाजप प्रवेशावर आश्चर्य व्यक्त केले आहे. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना ते म्हणाले, “शेट्टर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करताना भाजपामध्ये त्यांचा अपमान होत असल्याचे म्हटले होते. तसेच भाजपाने त्यांना विधानसभेचे तिकीट नाकारल्याचेही त्यांनी सांगितले होते. शेट्टर यांना काँग्रेसने २०२३ ची विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी तिकिट दिले.

# शोएब मलिक सना जावेदलाही घटस्फोट देईल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

काही दिवसांपूर्वी क्रिकेटर शोएब मलिकने अभिनेत्री सना जावेदसह निकाह केला. त्याचा फोटोच त्याने सोशल मीडियावर पोस्ट केला. सानिया मिर्झाने त्याला खुला म्हणजेच तलाक दिला. सना जावेद या पाकिस्तानी अभिनेत्री बरोबर त्याने तिसरं लग्न करुन संसार थाटला आहे. शोएबवर सोशल मीडियावर टीकेची झोड उठली आहे. शोएब आणि सानिया यांच्यात काहीही सुरळीत नाही अशा बातम्या गेल्या वर्ष ते दोन वर्षे येत होत्या. त्या सगळ्या चर्चांचं कारण शोएब मलिकच्या तिसऱ्या लग्नानंतर सगळ्यांना कळलंय. आता प्रसिद्ध लेखिका तस्लिमा नसरीन यांनी परखड मत मांडलं आहे.मला वाटत होतं की शोएब मलिक आणि सानिया मिर्झा हे एक आनंदी जोडपं आहे.सानिया मिर्झासारखी हुशार मुलगी अशा शी लग्न कसं काय करु शकते? शोएब मलिक एक दिवस सना जावेदलाही घटस्फोट देईल आणि X बरोबर लग्न करेल. नंतर X ला घटस्फोट देईल, Y बरोबर लग्न करेन, त्यानंतर Y ला घटस्फोट देऊन Z शी लग्न करेल. त्याचा इस्लामवर विश्वास असेल तर त्याला घटस्फोट घेण्याचीही गरज नाही. एकाच वेळी तो चार बायकाही तो नांदवू शकतो. अशी पोस्ट तस्लिमा नसरीन यांनी केली. इतकंच काय तो त्याच्या धर्मगुरुंना मानत असेल तर तो एकावेळी ११ बायकांशीही संसार करु शकतो. या आशयाची पोस्ट तस्लिमा नसरीन यांनी केली आहे.४१ वर्षीय शोएब आणि सानिया मिर्झाचं २०१० साली लग्न झालं होतं. हे शोएबचं दुसरं लग्न होतं. त्याआधी शोएब आणि आयेशा सिद्दीकी यांचा घटस्फोट झाला होता. सानिया आणि सोहराब मिर्झा यांचा साखरपुडा झाला पण लग्न झालं नव्हतं.

## 'कॉफी विथ करण'च्या 'कॉफी हॅम्पर'मध्ये भन्नाट गोष्टी!



बॉलिवूड दिग्दर्शक करण जोहर हा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतो. नुकताच करणचा लोकप्रिय कार्यक्रम कार्यक्रम 'कॉफी विथ करण'चा सीझन ८ पार पडला. वेगवेगळ्या बॉलिवूड कलाकारांनी या नव्या सीझनमध्ये हजेरी लावली आणि मनसोक्त गॉसिप करत गप्पा मारल्या. गॉसिपप्रमाणेच करण जोहरचा हा चॅट शो त्याच्या खास 'कॉफी हॅम्पर'मुळेही चर्चेत असतो. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या पाहुण्यांबरोबर 'रॅपिड फायर' राऊंड खेळत करण त्या पाहुण्यांपैकी एकाचं नाव विजेता म्हणून जाहीर करतो अन् त्या व्यक्तिला करण जोहरकडून हे खास 'कॉफी हॅम्पर' देण्यात येतं. दिसायला एकदम मोठं असलेल्या या हॅम्परमध्ये सेलिब्रिटीजना नेमक्या कोणत्या भेटवस्तू मिळतात याची प्रेक्षकांना उत्सुकता असते. या हॅम्परमध्ये अत्यंत महागड्या आणि ऊंची वस्तु असतात ही गोष्ट याआधीदेखील करण जोहरने स्पष्ट केली होती.आता नुकतंच एका व्हिडीओच्या माध्यमातून करणने प्रथमच या त्याच्या खास 'कॉफी हॅम्पर'मध्ये नेमकं काय काय असतं याबद्दल खुलासा केला आहे. या हॅम्परमधील सगळ्याच गोष्टींचा उलगडा करणने केला नसला तरी प्रामुख्याने या हॅम्परमध्ये सेलिब्रिटीजना कोणत्या गोष्टी दिल्या जातात ते करणने सांगितलं आहे. करणने या व्हिडीओच्या माध्यमातून ते हॅम्पर उघडून त्यातील काही खास गोष्टी दाखवल्या आहेत. करणच्या या झकास कॉफी हॅम्परमध्ये मोबाइल फोन्स आणि गो प्रो कॅमेरासारख्या इलेक्ट्रॉनिक गोष्टी असतात. याबरोबरच काही स्कीन केअर आणि ब्युटी प्रॉडक्टही आपल्याला पाहायला मिळतात. ऊंची ब्रँडचा चहा, याबरोबरच या आठव्या सीझनच्या निमित्ताने करणने या हॅम्परमध्ये एक सुंदरसा हाताने नवलेला कॉफी मगदेखील सामील केला आहे.

## लग्नानंतर परिणीतीचा अभिनयाला अलविदा?



परिणीती चोप्राने सप्टेंबर महिन्यात राजकीय नेते राघव चड्ढा यांच्याशी लग्नगाठ बांधली. लग्नानंतर तिचा मिशन रानीगंज हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला, पण या चित्रपटाने फार चांगली कमाई केली नाही. सध्या ती तिच्या 'चमकीला' या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. याचदरम्यान, परिणीती चोप्राने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट तिच्या कामाबद्दल आहे. लग्नानंतर परिणीती पतीप्रमाणे राजकारण जाईल, अशा चर्चाही होत्या. तिला याबाबत विचारण्यात आलं होतं, ज्यावर तिने आपल्याला राजकारणात रस नसल्याचं म्हटलं होतं. पण आता तिने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर करत करिअरबद्दल महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. परिणीती संगीत क्षेत्रात करिअरची सुरुवात करणार आहे.परिणीती चोप्रा तिच्या नव्या प्रवासाबद्दल खूप उत्सुक आहे. ही आनंदाची बातमी चाहत्यांबरोबर शेअर करताना अभिनेत्रीने एक लांबलचक कॅप्शनही लिहिलं आहे. "संगीत हे माझ्यासाठी नेहमीच हॅप्पी प्लेस राहिलंय. मी अनेक संगीतकारांना अनेक वर्षांपासून स्टेजवर परफॉर्म करताना पाहत आले आहे. आता मीही या जगाचा एक भाग होणार आहे. मी स्वतःला खूप नशीबवान समजते. माझ्या आयुष्यातील एक नवीन अध्याय सुरू करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे," असं परिणीतीने लिहिलं आहे. परिणीतीच्या या पोस्टवर चाहते आणि बॉलीवूडमधील तिचे मित्र-मैत्रिणी लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. तिच्या या नव्या प्रवासासाठी चाहते तिला खूप शुभेच्छा देत आहेत. मनीष मल्होत्रानेही परिणीतीच्या या पोस्टवर कमेंट करत शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रियांकाचा बहिणीसाठी खास मेसेज

'बिग बॉस १७' हा शो अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. शोच्या ग्रँड फिनालेला अवघे चार दिवस बाकी आहेत. अंकिता लोखंडेचा पती या शोच्या फिनालेमध्ये पोहोचू शकला नाही. मुनव्वर फारुकी, मनारा चोप्रा, अभिषेक कुमार, अरुण महाशेट्टी व अंकिता लोखंडे हे टॉप पाच स्पर्धक फिनालेमध्ये पोहोचले आहेत. मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर तिची बहीण व बॉलीवूड अभिनेत्री प्रियांका चोप्राने तिच्यासाठी पोस्ट शेअर केली आहे. प्रियांका चोप्रा ही मनारा चोप्राची मामेबहीण आहे. मनारा या शोमध्ये सहभागी झाल्यानंतरही प्रियांकाने इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करत मनाराला शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर आता मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर प्रियांकाने तिचा एक फोटो पोस्ट करत तिचं अभिनंदन केलं आणि तिच्यासाठी मेसेज पाठवला आहे.प्रियांका चोप्राने मनाराचा बिग बॉसमधील एक फोटो स्टोरीला शेअर केला. "आपलं बेस्ट दे आणि बाकी सगळं विसरून जा," असं कॅप्शन दिलं आहे. तिने मनारा चोप्राला टॅग करत रेड हार्ट इमोजी पोस्ट केला आहे. यासोबत प्रियांकाने मिताली आणि तिच्या आईलाही टॅग केलं आहे.काही दिवसांपूर्वी प्रियांका चोप्राची आई मधु चोप्रा यांनीही 'बिग बॉस १७' मधील स्पर्धक मनारासाठी एक व्हिडीओ शेअर केला होता.



## अमिताभ यांना मदतीचा हात

अमिताभ बच्चन यांना बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखलं जातं. 'बिग बी' यांनी ८० च्या दशकात संपूर्ण हिंदी मनोरंजन विश्वावर अधिराज्य गाजवलं. त्या काळात अमिताभ यांचा प्रत्येक चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरत होता. पण, पुढे ९० च्या दशकात बॉलीवूडमध्ये अनेक नवनवीन कलाकारांची एन्ट्री झाली. त्यामुळे अमिताभ यांना हवेतसे चित्रपट मिळत नव्हते. १९९९ मध्ये त्यांच्या व्यावसायिक कंपनीला मोठा फटका बसला आणि ते कर्जबाजारी झाले. बँकेत एकही रुपया नव्हता अशी वेळ त्यांच्यावर आली होती. आयुष्यातील हा कठीण काळ 'बिग बी' यांनी काही वर्षांपूर्वी एका कार्यक्रमादरम्यान सांगितला होता. त्यांचा हा व्हिडीओ अभिजीत चोक्शी यांनी एक्स अकाऊंटवर शेअर केला आहे. यात अमिताभ यांनी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील कठीण प्रसंगाबाबत सांगत अंबानी कुटुंबीयांचे आभार मानले आहेत.

## रितेश देशमुखचा जिनिलीयासह भन्नाट डान्स!

जिनिलीया व रितेश देशमुख यांची जोडी मराठी कलाविश्वात प्रचंड लोकप्रिय आहे. दोघेही सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असतात. अभिनेत्याने इन्स्टाग्रामवर शेअर केलेला असाच एक व्हिडीओ सध्या चर्चेत आला आहे. यामध्ये रितेश-जिनिलीया एकत्र लोकप्रिय गाण्यावर थिरकत असल्याचं पाहायला मिळत आहे. हा व्हिडीओ शेअर करत त्यांनी १८ वर्षांपूर्वीच्या आठवणींना उजाळा दिला आहे.



अभिनेता रितेश देशमुखचा 'अपना सपना मनी मनी' हा कॉमेडीपट २००६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. यामधील 'गिटार साँग' सर्वत्र लोकप्रिय झालं होतं. आजही प्रत्येक समारंभात "दिल मैं बजी गिटार..." हे गाणं आवर्जून वाजवलं जातं. या गाण्याचं मराठी व्हर्जन 'श्रीदेवी प्रसन्न' या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे.

# बॉक्सर मेरी कोमच्या निवृत्तीच्या चर्चा!

## एकामागोमाग रेकॉर्ड घडवणाऱ्या मेरीचा बॉक्सिंगला राम राम

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**सहा वेळा जग्गजेते पदावर नाव कोरणारी आणि २०१२ मध्ये भारताला ऑलिम्पिक पदक मिळवून देणाऱ्या मेरी कोमने बॉक्सिंगला राम राम केल्याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगल्या आहेत.. बुधवारी तिने आपण बॉक्सिंगमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केल्याचं सांगितलं जातं आहे. मात्र या सगळ्या चर्चांदरम्यान मेरी कोमची पोस्ट समोर आली आहे. माझ्या निवृत्तीच्या बातम्या येत आहेत मात्र मी कुठलीही घोषणा केलेली नाही असं तिने म्हटलं आहे. आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग संघाच्या नियमानुसार चाळिशी ओलांडलेल्या बॉक्सर्सना बॉक्सिंगच्या स्पर्धेत भाग घेण्याची संमती नाही. मात्र आता मेरी कोमचं म्हणणं वेगळं आहे.**

“मी बॉक्सिंगमधून निवृत्त होत असल्याची कुठलीही घोषणा केलेली नाही. माझं जे म्हणणं होतं ते चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आलं. जेव्हा मला निवृत्ती जाहीर करायची असेल तेव्हा मी स्वतः माध्यमांसमोर येऊन म्हणणं मांडेन. काही मीडिया रिपोर्टनुसार मी निवृत्तीची घोषणा केली आहे असं सांगितलं जातं आहे मात्र ते योग्य नाही. मी २४ जानेवारी रोजी डिब्रूगढ येथील एका शाळेत गेले होते. तिथे मी हे म्हटलं होतं की मला अजूनही खेळण्याची इच्छा आहे. मात्र माझं आत्ताचं वय पाहता ऑलिम्पिकमध्ये मला सहभागी होता येणार नाही. त्यामुळे मी माझा खेळ करत राहते आहे. इतकंच नाही तर मी माझ्या फिटनेसवरही भर देते आहे. असं म्हटलं होतं त्याचा चुकीचा अर्थ काढला गेला. मला जेव्हा निवृत्ती जाहीर करायची असेल तेव्हा मी निवृत्ती सगळ्यांच्या समोर येऊन जाहीर करेन.”मेरी कोमने जागतिक अॅमेच्योर बॉक्सिंग चॅंपियनशिप स्पर्धेत सहावेळा जगज्जेतेपद मिळवलं आहे. हा रेकॉर्ड करणारी ती एकमेव भारतीय महिला बॉक्सर आहे. तसंच मेरी कोम वर्ल्ड चॅंपियनशिपमध्ये सात वेळा पदक जिंकण्याच्या रेकॉर्डही तिच्या नावे आहे. २०१८ मध्ये मणिपूर सरकारने तिच्या बॉक्सिंगमधल्या कारकिर्दीसाठी



तिला मीथोई लीमा ही उपाधी देऊन गौरवलं होतं. तसंच मेरी कोमला पद्मश्री, पद्म भूषण, अर्जुन पुरस्कार आणि इतर पुरस्कार देऊनही गौरवण्यात आलं आहे. मेरी कोमच्या आयुष्यावर आधारित मेरी कोम नावाचा सिनेमाही प्रदर्शित झाला आहे. अभिनेत्री प्रियांका चोप्राने यात मेरी कोमचं पात्र साकारलं आहे. २०१२ मध्ये लंडन ऑलिम्पिक गेम्समधल्या ५१ किलो वजनी गटात तिने कांस्य पदक जिंकलं होतं. २०१४ मध्ये दक्षिण कोरियातील इंचियोन या ठिकाणी एशियन गेम्समध्ये सुवर्ण पदक मिळवणारी ती पहिली भारतीय महिला बॉक्सर ठरली. २०१८ मध्ये राष्ट्रकुल स्पर्धेतही तिने सुवर्णपदक जिंकलं होतं. ANI या वृत्तसंस्थेने मेरी कोमने निवृत्ती घेतल्याची घोषणा केल्याचं वृत्त दिलं होतं. मात्र आता मेरी कोमने हे वृत्त फेटाळलं आहे.२०१२ मध्ये जेव्हा मेरीने ऑलिम्पिक पदक जिंकलं त्यानंतर तिने तिसऱ्या मुलाला जन्म दिला. त्यानंतर तिने काही काळ विश्रांती घेतली. २०१८ मध्ये दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या वर्ल्ड चॅंपियनशिपमध्ये तिने जोरदार कमबॅक केलं आणि युक्रेनच्या हन्ना ओखोटाला ५-० ने हरवलं. तसंच यानंतर एक वर्षाने तिने तिचं आठवं वर्ल्ड मेडल जिंकलं. आत्तापर्यंत भारतीय बॉक्सिंगपटूने कधीही न केलेली कामगिरी मेरी कोमने करुन दाखवली आहे.“मी बॉक्सिंगमधून निवृत्त होत असल्याची कुठलीही घोषणा केलेली नाही. माझं जे म्हणणं होतं ते चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आलं. जेव्हा मला निवृत्ती जाहीर करायची असेल तेव्हा मी स्वतः माध्यमांसमोर येऊन म्हणणं मांडेन. काही मीडिया रिपोर्टनुसार मी निवृत्तीची घोषणा केली आहे असं सांगितलं जातं आहे मात्र ते योग्य नाही. मी २४ जानेवारी रोजी डिब्रूगढ येथील एका शाळेत गेले होते. तिथे मी हे म्हटलं होतं की मला अजूनही खेळण्याची इच्छा आहे. मात्र माझं आत्ताचं वय पाहता ऑलिम्पिकमध्ये मला सहभागी होता येणार नाही. त्यामुळे मी माझा खेळ करत राहते आहे. इतकंच नाही तर मी माझ्या फिटनेसवरही भर देते आहे. असं म्हटलं होतं त्याचा चुकीचा अर्थ काढला गेला. मला जेव्हा निवृत्ती जाहीर करायची असेल तेव्हा मी निवृत्ती सगळ्यांच्या समोर येऊन जाहीर करेन.”मेरी कोमने जागतिक अॅमेच्योर बॉक्सिंग चॅंपियनशिप स्पर्धेत सहावेळा जगज्जेतेपद मिळवलं आहे. हा रेकॉर्ड करणारी ती एकमेव भारतीय महिला बॉक्सर आहे. तसंच मेरी कोम वर्ल्ड चॅंपियनशिपमध्ये सात वेळा पदक जिंकण्याच्या रेकॉर्डही तिच्या नावे आहे. २०१८ मध्ये मणिपूर सरकारने तिच्या बॉक्सिंगमधल्या कारकिर्दीसाठी तिला मीथोई लीमा ही उपाधी देऊन गौरवलं होतं. तसंच मेरी कोमला पद्मश्री, पद्म भूषण, अर्जुन पुरस्कार आणि इतर पुरस्कार देऊनही गौरवण्यात आलं आहे.

### मेरी कोमची पोस्ट समोर

अभिनेत्री प्रियांका चोप्राने यात मेरी कोमचं पात्र साकारलं आहे. २०१२ मध्ये लंडन ऑलिम्पिक गेम्समधल्या ५१ किलो वजनी गटात तिने कांस्य पदक जिंकलं होतं. २०१४ मध्ये दक्षिण कोरियातील इंचियोन या ठिकाणी एशियन गेम्समध्ये सुवर्ण पदक मिळवणारी ती पहिली भारतीय महिला बॉक्सर ठरली. २०१२ मध्ये भारताला ऑलिम्पिक पदक मिळवून देणाऱ्या मेरी कोमने बॉक्सिंगला राम राम केल्याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगल्या आहेत.. बुधवारी तिने आपण बॉक्सिंगमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केल्याचं सांगितलं जातं आहे. मात्र या सगळ्या चर्चांदरम्यान मेरी कोमची पोस्ट समोर आली आहे.

# भारताच्या 'फिरकी'ची कमाल इंग्लंड बेहाल!

## अक्षर पटेलने फोडली जो रूट आणि जॉनी बेअरस्टोची जोडी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंडमधील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय फिरकीपटू रवींद्र जडेजा. आर. आणि अक्षर पटेल यांनी इंग्लंडच्या फलंदाजांची ‘फिरकी’ घेतली. पहिला डाव केवळ 246 धावांमध्ये गुंडाळला गेला. बेन स्टोक्स याने कर्णधाराला साजेसा खेळ करत 70 धावा केल्या. भारताच्या वतीने रवींद्र जडेजाने 3, अश्विनने 3, अक्षर पटेलने दोन, बुमराहने दोन बळी घेतले.**

इंग्लडचा कर्णधार बेन स्टोक्स याने टॉस जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीवीर जॅक क्रोली आणि बेन डकेट यांनी संघाला आक्रमक सुरुवात करून दिली. दोघांनी चार षटकात २५ धावा केल्या. मात्र इंग्लंडला पहिला धक्का 12व्या षटकात 55 धावांवर बसला. अश्विनने बेन डकेटला यष्टीचीत ( एलबीडब्ल्यू) केले. डकेट याने ३९ चेंडूत सात चौकारांच्या मदतीने ३५ धावा केल्या. १५ व्या षटकामध्ये फिरकीपटू रवींद्र जडेजाच्या गोलंदाजीवर ऑली पोपने रोहितकडे झेल दिला. त्याने केवळ १ धावेचे योगदान दिले. यानंतर पुढील षटकात फिरकीपटू अश्विनच्या गोलंदाजीवर फटकेबाजीच्या प्रयत्नात असणाऱ्या क्रॉलीचा सिराजचे



अप्रतिम झेल घेतला. क्रॉलीने ४० चेंडूत २० धावा केल्या.जो रूट आणि जॉनी बेअरस्टो यांनी इंग्लंडचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्यांची लंचनंतर ५० धावांची भागीदारीही झाली. मात्र ३३ व्या षटकामध्ये अक्षर पटेल याने ही जोडी फोडली. अक्षरच्या फिरकीवर बेअरस्टो त्रीफळाचीत ( क्लीन बोल्ड) झाला. १२१ धावांवर इंग्लंडला चौथा धक्का बसला. बेअरस्टोने ५८ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. यामध्ये ५ चौकारांचा समावेश होता.इंग्लंडला 125 धावांवर पाचवा धक्का बसला. रवींद्र जडेजाने जो रूटला जसप्रीत बुमराहकडे झेलबाद केले. त्याने 60 चेंडूत 29 धावा केल्या. यानंतर इंग्लंडला 137 धावांवर सहावा धक्का बसला. अक्षर पटेलने बेन फॉक्सला यष्टिरक्षक श्रीकर भरतकरवी झेलबाद केले. त्याने केवळ चार धावांचे योगदान दिले. इंग्लंडला 155 धावांवर सातवा धक्का बसला. जसप्रीत बुमराहनेही रेहान अहमदला यष्टिरक्षक केएस भरतकडे झेलबाद करून खाते उघडले.जडेजाने ५६ व्या षटकात २३ धावांवर खेळणाऱ्या टॉम हार्टलेनला क्लीन बोल्ड करत इंग्लंडला आठवा धक्का दिला.भारत आणि इंग्लंडमधील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय फिरकीपटू रवींद्र जडेजा. आर. अश्विन आणि अक्षर पटेल यांनी इंग्लंडच्या फलंदाजांची ‘फिरकी’ घेतली. इंग्लडचा पहिला डाव केवळ 246 धावांमध्ये गुंडाळला गेला.

### इंग्लंड फलंदाजांची ‘फिरकी’ घेतली

भारताच्या वतीने रवींद्र जडेजाने 3, अश्विनने 3, अक्षर पटेलने दोन, बुमराहने दोन बळी घेतले.भारत आणि इंग्लंडमधील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय फिरकीपटू रवींद्र जडेजा. आर. आणि अक्षर पटेल यांनी इंग्लंडच्या फलंदाजांची ‘फिरकी’ घेतली.